# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२८/०१/२०११

दि. २८/०१/२०११ रोजी घेण्यांत आलेल्या परिवहन समिती सभेचे इतिवृत्त.

३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीची सभा शुक्रवार दिनांक २८/०१/२०११ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.मिलिंद जगन्नाथ चोडनकर | सभापती |
| २ | श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी | सदस्य |
| ३ | श्री. मोहन रामसिंग कंडारे | सदस्य |
| ४ | श्री. सुनिल एस. गंगवानी | सदस्य |
| ५ | श्री. संजय आयोध्याप्रसाद सिंग | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, सदस्य (स्थायी समिती, सभापती)
२. श्री. कृष्णा गिरीया पुजारी
३. श्री.लालता प्रसाद शिवमुर्त तिवारी
४. श्री. जे.के. ढोके
५. श्री. नामदेव मरसाळे
६. श्री. विलास डांगे
७. श्री. आनंद शांताराम शिंदे
८. श्री. आदिनाथ यादवराव जाधव

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. सतोंष देहेरकर, उपआयुक्त,
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री.दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. तानाजी पतंगराव

सांयकाळी ४.१५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :— सन २०१०—११ चे सुधारीत व २०११—२०१२ चे मूळ अंदाजपत्रक तयार करणे.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे:—</u> मागील अर्थसंकल्पात तरतुद केलेल्या रकमेपैकी किती रक्कम खर्च झाली आहे.?

<u>श्री. दिपक चिमणकारे:—</u> मागील अर्थसंकल्पात तरतुद केलेल्या रकमेपैकी ४० हजार रुपये खर्च झाले आहेत.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे:—</u> उल्हासनगर महापालिका क्षेत्रात शहर बस सेवा उपक्रम सुरळीत व आधुनिक पध्दतीने सुरू करणेकामी संबधित अधिका—यासह परिवहन समिती सदस्याचा बंगलोर, जालंधर,किंवा भुवनेश्वर यापैकी एका शहराच्या परिवहन सेवेची पाहणी व अभ्यास करण्यासाठी आणि प्रयोजनार्थ अर्थ संकल्पीय अंदाजपत्रकात जी तरतुद करण्यांत आली होती त्याचे काय झाले?

<u>श्री. सतोंष देहेरकर, उपआयुक्त</u>:—_ भुवनश्वर येथील अभ्यास दौऱ्यासाठी सुरुवातीस ३ लाख रुपये खर्च अपेक्षित होता तिकिटांचे आरक्षणाची रक्कम पकडुन तो खर्च ५ लाख रुपयांपर्यंत जात होता. सद्या आपणाकडे जो परिवहन उपक्रम चालु आहे तो खाजगी ठेकेदारामार्फत चालु आहे त्यामुळे या उपक्रमासाठीचे अभ्यास दौऱ्याचा खर्च महापालिकेने का करावा? अशा प्रकारचा आक्षेप त्या संचिकेवर नोदविण्यात आलेला आहे

<u>सदस्य श्री. सुनिल गंगवानी:—</u> भुवनेश्वर येथील परिवहन उपक्रमाची पहाणी केल्यानंतर जर का असे दिसुन आले की, तेथे राबविली जात असलेली एखादी योजना महापालिकेच्या फायदयाची आहे अशी योजना सद्या आपल्या परिवहन उपक्रमात राबविली जात नाही अशी योजना आपल्या येथे राबविला जावू शकेल, म्हणुनच अभ्यास दौऱ्याची आवश्यकता आहे.

<u>सदस्य श्री. राजेश टेकचंदानी:—</u> परिवहान ठेकेदार परिवहन सदस्यांचे निर्देश मानत नाहीत तर मग ठेकेदारी तत्वावर चालविण्यात येणाऱ्या परिवहन उपक्रमाच्या अभ्यास दौऱ्यासाठी महापालिकेने खर्च का करावा? अशा प्रकारचा आक्षेप नोंदविण्यात येत आहे परंतु ठेकेदारास परिवहनच्या पार्किंग व डेपोसाठी महापालिकेची करोडो रुपये किंमतीची जागा देण्यात आलेल्या आहेत. ही जागा बस डेपोसाठी तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यासाठी देण्यात आलेल्या असतांनाही ठेकेदार तेथे पक्या स्वरुपाचे बाधंकाम करत आहे त्यास महापालिकेची मंजुरी आहे काय?

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे:—</u> उल्हासनगर महापालिका क्षेत्रासाठी परिवहन सेवा चालु करण्यात आली आहे, परंतु ती कल्याण पासुन बदलापुर पर्यंत चालविली जात आहे. त्याबाबत परवानगी घेण्यात आली काय?

<u>सदस्य श्री. सुनिल गंगवानी:—</u> यासाठी परिवहन समितीची परवानगी घेतली नसेल तर ठेकेदारावर काय कारवाई करण्यात आली आहे?

<u>श्री. सतोंष देहेरकर, उपआयुक्त</u>:—_ठेकेदारास या बाबतीत एक पत्र देण्यात आलेले आहे.

<u>सदस्य श्री. राजेश टेकचंदानी:—</u> शहराबाहेरील मार्गावर बस सेवा सुरु करण्या विषयी परिवहन समितीची मान्यता घेतली आहे काय?

<u>सभापती श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर</u>:—_पाच ते पंचवीस मार्गावर बस चालविण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

<u>सदस्य श्री. राजेश टेकचंदानी:—</u> ठेकेदारास बसेच ची संख्या कमी जास्त करायची असेल तर त्याबाबतचा प्रस्ताव परिवहन समिती समोर आला पाहिजे किवा नाही? की, अधिकाऱ्यांच्या स्तरावर त्यास मान्यता दिली जाते. येणाऱ्या सभेमध्ये आम्हाला तीन चार मुदद्यांचे स्पष्टीकरण पाहिजे. एक तर आमच्या शहरासाठी सुरु केलेली बस सेवा शेजारच्या शहरामध्ये दिली जात आहे. दुसरा बसस्टॉप चा मुददा आहे तसेच ठेकेदाराकडुन प्रत्येक किलोमिटर मागे रॉयल्टी घेतली जाते त्या संदर्भात, किती किलोमिटर बसेस धावल्या या विषयी मिटरची तपासणी कोण करत आहे?

<u>श्री. दिपक चिमणकारे:—</u> किती किलोमिटर बसेस धावल्या याविषयी मिटरची तपासणी नियमित केली जाते.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे:– </u> ठेकेदार आपल्या मर्जीनुसार त्याला फायदेशीर ठरेल अश्या मार्गावर बस सेवा चालवित आहे यासाठी ठेकेदारावर अकुंश ठेवण्यासाठी एक तज्ञ समिती नेमली पाहिजे.

<u>श्री. दिपक चिमणकारे:–</u> शहराबाहेरील मार्गावर बससेवा चालविण्यासाठी निविदापत्रकात दिलेल्या सर्व अटी व शर्तीनुसार बस सेवा चालवायची आहे अशी आपल्या करारनाम्यामध्ये तरतुद आहे बस सेवेचे मार्ग ठरवुन दिल्यानंतर त्यामार्गांवर बससेवेची वारंवारता (फ्रिक्वेनसी) कायम ठेवायची आहे आणि कमीत कमी किती प्रवासी असल्यानंतर बससेवा दिली पाहिजे याची त्यात तरतुद आहे.

<u>सदस्य श्री. राजेश टेकचंदानी:–</u> आपल्या शहरासाठी सुरु केलेल्या परिवहन उपक्रमाच्या बसेस शेजारच्या शहरामध्ये चालतात. आपल्या शहरामध्ंये फक्त दोन तीनच बसेस चालतात अपु–या बससंख्ये मुळे लोकांना धकाबुक्की सहन करुन प्रवास करावा लागत आहे यासाठी काहीतरी प्रभावी उपाययोजना केली पाहिजे व परिवहन उपक्रमाचे संपुर्ण लेखाजोखा समितीस सादर केला पाहिजे.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे:– </u> ठेकेदारास कल्याण अबंरनाथ, बदलापूर यामार्गावरील बस सेवेत जास्त फायदा होत असल्यामुळे तो आपल्या शहरातील बसेस या मार्गांवर चालवत आहे. आम्ही हा जो परिवहन उपक्रम सुरु केला आहे तो या शहरातील नागरीकांच्या सुविधेसाठी सुरु केला आहे. आम्ही जे मार्ग ठरवुन दिलेले आहेत त्याच मार्गांवर बसेस धावल्या पाहिजेत परंतु प्रत्यक्षात तसे होत नसल्यामुळे नागरिक आम्हास फोन करुन याबाबतीत विचारणा करतात.की या मार्गावर आज बस का चालविण्यांत आली नाही? बस सेवेसाठी आम्ही १४ मार्ग निश्चित करुन दिले आहेत, त्याच मार्गांवर बसेस चालल्या पाहिजेत व ठेकेदारांवर समितीचा अकुंश असला पाहिजे नाहीतर उद्या सकाळ तो म्हणेल की, कल्याण भिवंडी मार्गावर बस सेवा सुरु केली तर अधिक फायदेशीर आहे यासाठी तो आपल्या शहरातील बसेसची संख्या कमी करुन कल्याण भिवंडी मार्गावर बसेस चालवेल असे होवु नये.

<u>सदस्य श्री. राजेश टेकचंदानी:–</u> आपण जो अर्थसंकल्प तयार करतो त्यानुसार खर्च तर होत नाही, व अभ्यास दौऱ्यांचे आयोजन होत नाही.

<u>सदस्य श्री. सुनिल गंगवानी:– </u> भुवनेश्वर शहराऐवजी दुसऱ्या एखादया शहरामध्ये अभ्यास दौरा आयोजित केला जावा.

<u>सभापती श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर</u>:– फक्त भुवनेश्वर येथेच ठेके पध्दतीने परिवहन सेवा चालु आहे यासाठी भुवनेश्वर येथे अभ्यास दौरा प्रस्तावित केला आहे.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे:– </u> मागील अर्थसंकल्पात परिवहन सदस्यांच्या मानधन व इतर भत्यासाठी तरतुद करण्यात आलेली आहे त्यानुसार सदस्यांना अद्याप पर्यंत मानधन का मिळाले नाही?

<u>श्री. सतोंष देहेरकर, उपआयुक्त</u>:–_ परिवहन सदस्यांना मानधन देण्याविषयीचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीस्तव पाठविला असुन अद्याप त्यास मंजुरी प्राप्त झालेली नाही. मजुंरी मिळण्यासाठी आम्ही वारंवार शासनाकडे स्मरण पत्र पाठवित आहोत.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे:– </u> होवु शकते तुमच्या स्मरणपत्रामध्ये काही त्रुटी असतील?

<u>श्री. सतोंष देहेरकर, उपआयुक्त</u>:– तसे काही नाही.

<u>सदस्य श्री. राजेश टेकचंदानी:–</u> प्रशासनाने या प्रस्तावाकडे गंभीरतेने लक्ष दिले पाहिजे.

<u>श्री. सतोंष देहेरकर, उपआयुक्त</u>:–_ होवु शकते की शासनाचा दृष्टीकोन असा असेल की उल्हासनगर मध्ये ठेकेपध्दतीवर बस सेवा चालु असल्यामुळे परिवहन सदस्यांना मानधन का दयावे?

<u>काही सदस्य :–</u>पास, पास.....

<u>सभापती, श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर :–</u> सदर विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव समंत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १** :– सन २०१०–११ चे सुधारीत व २०११–२०१२ चे मूळ अंदाजपत्रक तयार करणे.

## प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे परिवहन व्यवस्थापकाचे अंदाज विचारात घेऊन "ब" अर्थसंकल्पीय अंदाज परिवहन समितीने तयार करावयाचे आहेत.सदर अंदाजीत परिवहन उपक्रमाचे संपादन, त्याचा विस्तार, त्याचे प्रशासन चालविणे व त्याची व्यवस्था यामुळे महानगरपालिका ज्याबद्दल या अधिनियमान्वये दायी असेल अशा सर्व रक्कमा आणि मुद्दल व व्याज यांचे हप्ते जसजसे देय होतील तसतसे ते भरण्याबाबत तरतुद केली पाहिजे.महानगरपालिकेने परिवहन उपक्रम खाजगी सहभागाने राबविण्याचे योजले असून अधिनियमातील तरतुदीनुसार वित्तिय वर्ष २०१०–२०११ चे उत्पन्न व खर्चाचे सुधारीत अंदाज पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| | | (आकडे हजारात) |
|---|---|---|
| "ब" अंदाजपत्रकिय उत्पन्न | : | ३२० |
| "ब" अंदाजपत्रकिय खर्च | : | ७४३ |

परिवहन सेवा खर्च
सभासदांना मानधन,सभा व इतर भत्ते

वर्ष २०१०–२०११ करिता उत्पन्न खर्चाचे अंदाज लक्षात घेता रहाणारी तुट "अ" अंदाजपत्रकातुन वर्ग करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष २०११–२०१२ साठी तयार करण्यात आलेला उत्पन्न व खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| | | (आकडे हजारात) |
|---|---|---|
| "ब" अंदाजपत्रकिय उत्पन्न | : | ७५३ |
| "ब" अंदाजपत्रकिय खर्च | : | १६३६ |

परिवहन सेवा खर्च
सभासदांना मानधन,सभा व इतर भत्ते

वर्ष २०११–२०१२ करिता उत्पन्न खर्चाचे अंदाज लक्षात घेता रहाणारी तुट "अ" अंदाजपत्रकातुन वर्ग करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे उत्पन्न व खर्चाचा गोषवारा मा. परिवहन समितीपुढे मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

<u>परिवहन समिती ठराव क्र. ९</u> <u>दिनांक २८/१/२०११</u>

सूचकाचे नाव : श्री. राजेश टेकचंदानी

अनुमोदकाचे नाव : श्री. मोहन कंडारे

ही परिवहन समिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ मधील सर्व तरतुदीस अधीन राहुन वर्ष २०१०—२०११चे सुधारीत व वर्ष २०११—२०१२ वं परिवहन व्यवस्थापकांचे अदांज विचारात घेवुन परिवहन उपक्रमाचे पुढील प्रमाणे अदांजपत्रक मंजुर करीत आहे.

<u>वर्ष २०१०—२०११ चे सुधारीत अदांजपत्रक</u>

| | | |
|---|---|---|
| "ब" अंदाजपत्रकिय उत्पन्न | : | ३२० |
| "ब" अंदाजपत्रकिय खर्च | : | ७४३ |

<u>वर्ष २०११—२०१२ चे मुळ अदांजपत्रक</u>

| | | |
|---|---|---|
| "ब" अंदाजपत्रकिय उत्पन्न | : | ७५३ |
| "ब" अंदाजपत्रकिय खर्च | : | १६३६ |

उत्पन्न व खर्चाचे अदांज लक्षात घेता राहणारी तुट ''अ'' अदांजपत्रकातुन वर्ग करण्यास मजुंरी देत आहे.

या ठरावाअंतर्गतचा निर्णय अतिंम असुन तो इतिवृत्त कायम होण्याचा वाट न पाहता थेट अमंलात आणण्यात येईल.

सूचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सभापती, श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर :—</u>या सभेचे कामकाज संपल्याचे मी जाहीर करतो

सांयकाळी ४.२५ वाजता सभापती श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर यांनी सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२/०२/२०११

**दि. २/०२/२०११ रोजी घेण्यांत आलेल्या परिवहन समिती सभेचे इतिवृत्त.**

४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीची सभा बुधवार दिनांक २/०२/२०११ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.मिलिंद जगन्नाथ चोडनकर | सभापती |
| २ | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, सदस्य | (स्थायी समिती, सभापती) |
| ३ | श्री. कृष्णा गिरीया पुजारी | सदस्य |
| ४ | श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी | सदस्य |
| ५ | श्री. मोहन रामसिंग कंडारे | सदस्य |
| ६ | श्री. सुनिल एस. गंगवानी | सदस्य |
| ७ | श्री. संजय आयोध्याप्रसाद सिंग | सदस्य |
| ८ | श्री. नामदेव मरसाळे | सदस्य |
| ९ | श्री. विलास डांगे | सदस्य |
| १० | श्री. आनंद शांताराम शिंदे | सदस्य |
| ११ | श्री. आदिनाथ यादवराव जाधव | सदस्य |

श्री. राजा गेमनानी परिवहन अभिकर्ता

तर,

खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते.

९. श्री.लालता प्रसाद शिवमुर्त तिवारी

१०.श्री. जे.के. ढोके

श्री. सतोंष देहेरकर, उप—आयुक्त, हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. सतोंष देहेरकर, उप—आयुक्त,

२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव

४. श्री.दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

२. श्री. तानाजी पतंगराव

सांयकाळी ४.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

---

⇨ **विषय क्र. १** :— मागील सभेचे दिनांक ५/७/२०१०, दिनांक १३/७/२०१० (त्यात दिनांक

३/१/२०११) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास, पास.....

**सभापती, श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर :—** मागील सभेचे दिनांक ५/७/२०१०, दिनांक १३/७/२०१० (त्यात दिनांक ३/१/२०११)रोजीचे परिवहन समितीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक ५/७/२०१०, दिनांक १३/७/२०१० (त्यात दिनांक ३/१/२०११) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राजेश टेकचंदानी

अनुमोदकाचे नांव : श्री. कृष्णा पुजारी

**परिवहन समिती ठराव क्र. :— ९ अ** **दिनांकः— २/२/२०११**

ही परिवहन समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक ५/७/२०१० रोजीचे पृष्ठ क्र. १, दिनांक १३/७/२०१० रोजीचे पृष्ठ क्र. २ ते ८ पर्यंतचे (त्यात दिनांक ३/१/२०११) रोजीचे पृष्ठ क्र. ९ ते १० पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**एकमताने**

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २ :—** शहर बस सेवा उपक्रमांत बस संख्या वाढविणेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. आनंद शिंदे :—**किती बस वाढवत आहात? कमीत कमी २० बसेस वाढविल्या पाहिजेत.

**श्री. राजा गेमनानी, परिवहन अभिकर्ता:—**माझ्याकडे जे पत्र आले आहे त्यामध्ये १५ बसेस वाढविण्याबाबत कळविले आहे.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—**बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर परिवहन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली होती. त्यावेळेस सुरुवातीस १० बसेस होत्या. त्यानंतर ठेकेदाराने आणखी पाच बसेस वाढविल्या आहेत. त्यानंतर आणखी १५ बसेस वाढविण्याबाबतीत आम्ही त्यांना पत्र दिले आहे.

<u>सदस्य श्री. आनंद शिंदे :—</u>उल्हासनगर महापालिका क्षेत्रामध्ये चालणा—या परिवहन उपक्रमाच्या बसेसमध्ये प्रवाश्यांना बसायला जागा तर मिळतच नाही. उभे राहायला सुध्दा जागा मिळत नाही. प्रवाशांना दरवाजाला लटकत प्रवास करावा लागत आहे.

<u>सदस्य श्री. कृष्णा पुजारी :—</u> उल्हासनगर महापालिका परिवहन उपक्रमाच्या बसेसपैकी जवळ जवळ १५ बसेस कल्याण, अंबरनाथ, बदलापूर या मार्गांवर चालतात. त्यामुळे उल्हासनगर महापालिका क्षेत्रात चालत असलेल्या बसची संख्या अतिशय अपुरी आहे. मोजक्या तीन—चार बसेसवर प्रवाशी तुटुन पडतात. कंडक्टरला तिकीट देण्यासही वेळ मिळत नाही.

<u>सदस्य श्री. संजय सिंग:—</u>परिवहन उपक्रम आपण उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांच्या सोयीसाठी चालु केलेला आहे. त्याचा सर्वात अगोदर फायदा उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील नागरीकांना झाला पाहिजे त्यानंतरच कल्याण, अंबरनाथ, बदलापूर या क्षेत्रातील नागरीकांना झाला पाहिजे.

<u>श्री. दिपक चिमनकारे(वाहन विभाग प्रमुख):—</u>बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर उल्हासनगर महापालिका क्षेत्रामध्ये खाजगी तत्वावर बस सेवा सुरु केली आहे. सुरुवातीस १४ मार्ग एमएमआरडीएकडुन मंजुर करुन घेतलेले आहेत. त्यानंतर प्रादेशिक व्यवस्थापक मुंबई प्रदेश यांच्याकडुन दिनांक २३/३/२०१० च्या पत्रान्वये मान्यता मिळविली आहे. त्यानंतर परमीट व तिकिटांच्या दरासाठी प्रस्ताव मंजुरीस टाकला होता. परिवहन उपक्रम सुरु झाल्यानंतर एसटी महामंडळाकडुन एक पत्र आले आहे त्यात लिहिले होते की, तुम्ही जी कैलास कॉलनी ते कॅम्प नं. १ पर्यंत बससेवा सुरु केली आहे या मार्गांवरच्या बस सेवेची एकाधिकारशाही आमची आहे. त्यामुळे या मार्गांवरील बससेवा तुम्ही बंद करा. आम्ही त्यावर त्यांना पत्र दिले आहे की, तुमच्याकडुन ना हरकत दाखला मिळण्यासाठी आम्ही यापुर्वीच प्रस्ताव सादर केलेला आहे. तुमच्याकडुन ना हरकत दाखला न मिळाल्यामुळे आम्ही शासनाकडुन ना हरकत दाखला प्राप्त केलेला आहे. त्यावर एसटी महामंडळाचे म्हणणे आहे की आम्ही चालवत असलेल्या मार्गांवरील एक एक मार्ग तुम्ही ताब्यात घ्या कारण की, लवकरच आम्ही या मार्गांवरील सेवा बंद करणार आहोत. त्यामुळेच महापालिका हद्दीबाहेरील कल्याण ते अंबरनाथ हा मार्ग बससेवेसाठी हाती घेतला आहे. सुरुवातीस कैलास कॉलनी ते खेमानी हा मार्ग हाती घेतला होता. त्यांनी सांगितले की अंबरनाथ ते खेमानी असा मार्ग घ्या. त्यानंतर बदलापूर ते कल्याण व त्यानंतर अंबरनाथ कैलास कॉलनी, श्रीराम चौक, नेतिवली ते कल्याण असा मार्ग घ्या. या मार्गांवरील आम्ही आमची बससेवा बंद करुन ती ग्रामीण भागात सुरु करत आहोत. शिव मंदिर ते कॅम्प नं. १, अंबरनाथ ते कॅम्प नं. १ व्हाया मेन बाजार या आपल्या मंजुर केलेल्या मार्गांमध्ये विठ्ठलवाडी पोलिस स्टेशन समोरील रस्ता खोदुन ठेवला होता त्यामुळे सदर मार्ग व्हीटीसी मार्गे सुरु केला. या अनुषंगाने सदर बससेवा ही उल्हासनगर महापालिकेची असली तरी आपणांस शासनाचे व एसटी महामंडळाच्या काही अटी व शर्तीनुसार चालावे लागते व त्या आधारावर त्यांनी ना हरकत दाखला दिला आहे व माझे त्यांच्याशी ब—याच वेळा बाचाबाची होत असते.

<u>सदस्य श्री. कृष्णा पुजारी :—</u>१०,१५ मार्गांवर आपण एवढया बसेस चालवु शकतो काय? आजच्या तारखेला कमीत कमी २५ ते ३० बसेस पाहिजे होत्या.

<u>श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—</u>परिवहन उपक्रम चालविण्यासाठी इतर काही पायाभुत सुविधा पाहिजेत की नाहीत?

<u>सदस्य श्री. आनंद शिंदे :—</u>काय सुविधा पाहिजेत ते तर सांगा?

<u>श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—</u>अंबरनाथ मध्ये बससेवा चालु करण्यासाठी तेथे बसथांबे बांधण्यासाठी परवानगी मिळविण्याकामी आपणाकडुन कोणतेही सहकार्य मिळाले नाही. कल्याण येथे छाया टॉकिजच्या बाजुला बस उभी केली जात होती, तेथील दुकानदारांनी हरकत घेतल्यामुळे ती पुढे पुढे करत बाईच्या पुतळयाजवळ उभी केली जात आहे. परवाच त्याठिकाणी रिक्षावाल्यांनी बसच्या पुढे रिक्षा अडवी घालुन गोंधळ घातला होता. बस उभी करण्यासाठी सोयीस्कर अशी जागा पाहिजे. या अगोदर अशा प्रकारचा प्रसंग कधी उद्‌भवला नाही, अपघात झाला नाही.आपण म्हणता की उल्हासनगर परिवहन उपक्रमाच्या बसेस उल्हासनगर महापालिका क्षेत्रातच चालल्या पाहिजे. परंतु निश्चित केलेले मार्ग हे एकमेकांशी समाविष्ट आहेत.

श्री. दिपक चिमनकारे(वाहन विभाग प्रमुख):—पाच मार्ग निश्चित करुन दिलेले आहेत.

श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—कैलास कॉलनी ते कॅम्प नं. १, कॅम्प नं. १ ते कैलास कॉलनी असे जे आपण मार्ग दिलेले आहेत त्या एकाच मार्गामध्ये तीन मार्ग समाविष्ट होत आहेत.

सदस्य श्री. मोहन कंडारे :—आम्ही निश्चित करुन दिलेल्या १४ मार्गांमध्ये एसटी महामंडळाचे किती मार्ग आहेत?

श्री. दिपक चिमनकारे(वाहन विभाग प्रमुख):—कल्याण ते अंबरनाथ, अंबरनाथ ते कल्याण असे काही मार्ग आहेत. बस सेवेच्या मार्गांचे जे विवरणपत्र आपणांस पुरविले आहे त्याच्या शेवटच्या पृष्ठावर सविस्तर माहिती पुरविण्यात आलेली आहे. हे मार्ग एसटी महामंडळाने मंजुर करुन दिलेले आहे.

सदस्य श्री. नामदेव मरसाळे :—परिवहन उपक्रमाचा जास्ती जास्त फायदा उल्हासनगर शहरवाशियांना झाला पाहिजे.

सदस्य श्री. कृष्णा पुजारी :—अंबरनाथ, बदलापूर या मार्गावर आपण बससेवा चालु केली असल्याने या १०—१५ बसेस कुठे कुठे फिरविणार?

श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :— मी १० ते ५० बस चालु करु शकतो परंतु त्यांच्या देखभालीसाठी डेपो पाहिजे. सर्व्हिस स्टेशन पाहिजे. पेट्रोल पंप पाहिजे. या पायाभुत सुविधा आपण उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. रात्री एक वाजेपर्यंत बस चालतात त्यानंतर पेट्रोल डिझेल भरण्यासाठी कुठे जायचे? त्यावेळी पेट्रोल पंप बंद होतात. सकाळी ६.०० वाजता पुन्हा बस सेवा चालु करावी लागते. महापालिकेकडुन कोणत्याही पायाभुत सुविधा दिल्या नसतांनाही आम्ही परिवहन सेवा चालवत आहोत. डेपोसाठी जागा दिली आहे तेथे पावसाळयात छत्री घेवुन आम्हांला प्रवाशांना तिकिटे दयावी लागत आहे. त्या ठिकाणी आम्ही छोटासा रुम बांधला आहे त्याबाबत हजार तक्रारी येत आहेत. तुम्ही इतर महापालिकेतील परिवहन सेवेची या परिवहन सेवेशी तुलना करता तर मग त्यांच्यासारख्या पायाभुत सुविधा सुध्दा दया.

सदस्य श्री. मोहन कंडारे :— कैलास कॉलनी येथील जागा बस डेपोसाठीची नाही. दुसरी कुठे जागा असेल ती त्यांना दया, त्यांना पायाभुत सुविधा उपलब्ध करुन दया.

श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—परिवहन उपक्रम बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर देतांना परिवहन अभिकर्त्याबरोबर जो करारनामा केला आहे त्यामध्ये जागा देणे बांधिल नाही. याविषयीच्या अटी, शर्ती नमुद आहेत.

श्री. दिपक चिमनकारे(वाहन विभाग प्रमुख):—निविदेमध्ये दोन्ही प्रकारच्या अटी, शर्ती आहेत. परिवहन उपक्रमासाठी पार्किंग, कार्यशाळा, सर्व्हिस स्टेशन इत्यादी कामासाठी जागा देणे बांधिल नाही परंतु जर काही जागा उपलब्ध झाली तर कराराच्या कालावधीपर्यंत योग्य त्या भाडयात देता येईल असेही नमूद आहेत.

श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—कैलास कॉलनी येथिल बस डेपोच्या आवारात ४ गाळे बांधले आहेत. एकामध्ये कर्मचा—यांच्या बैठकीची व्यवस्था केली आहे. ड्रायव्हर कंडक्टर यांना कपडे बदलण्यासाठी जागा नको आहे का? त्यांना कपडे बदलण्यासाठी एका गाळयामध्ये व्यवस्था केली आहे. एक जागा स्पेअरपार्टसाठी आहे.

श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—आपण तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था करु शकता.

श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—आपल्या निविदेमध्ये लिहिले आहे की, ज्या दिवशी निविदा कालावधी संपेल त्यादिवशी परिवहन उपक्रमाच्या ज्या काही मिळकती असतील त्या महापालिकेच्या मालकीच्या होतील.

सदस्य श्री. आनंद शिंदे :—महापालिकेने आपणांस काही पायाभुत सुविधा दिल्या नाहीत किंवा कोणत्याही परवानग्या दिल्या नाहीत. तर आपण या परिवहन उपक्रमासाठी दिड करोड रुपये खर्च का करत आहात?

श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :— जोपर्यंत महापालिकेकडुन सहकार्य मिळत नाही. तोपर्यंत मी बससेवा चालवु शकत नाही. मी बससेवा बंद करतो. मी नेहमी फोन करुन सांगतो की कल्याण मध्ये अशी अशी अडचण आहे, तेथे तीन दिवस संप पुकारण्यात आला होता. लाठी चार्ज झाला होता त्यावेळी कुणीही सहकार्य केले नाही.

सदस्य श्री. राजेश टेकचंदानी :—परिवहन उपक्रम आम्ही यासाठी चालु केला आहे की, लोकांना चांगल्यात चांगली सेवा मिळावी. ठेकेदाराच्या सोयीसाठी आम्ही परिवहन उपक्रम सुरु केलेला नाही. बस डेपोसाठी त्यांना जे भुखंड दिले आहेत. त्यामध्ये ते जर समाधानी नसतील तर त्यांनी ते महापालिकेस परत करावेत.

श्री. दिपक चिमनकारे(वाहन विभाग प्रमुख):— महासभेने ठराव पारीत करुन ते भुखंड दिले आहेत.

सदस्य श्री. सुनिल गंगवानी :—ते कशासाठी दिले आहेत.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—त्यांनी ना हरकत दाखला घेतला आहे काय? त्यांच्यावर पिटीशन दाखल झाली आहे. श्री. खडकबान यांनी सनद साठी अर्ज केलेला आहे. उदया सकाळ ते सनद घेवुन आले तर तुम्ही काय करणार?

सदस्य श्री. मोहन कंडारे :— जेव्हा विकास आराखडा तयार केला तेव्हा एसटी डेपोसाठी कोणती जागा आरक्षित करण्यात आली होती? ते सांगा.

श्री. दिपक चिमनकारे(वाहन विभाग प्रमुख):—सुधारीत विकास आराखडयामध्ये कैलास कॉलनी येथिल जागा परिवहन आरक्षित केली आहे.

श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—एकुण सात एकरचा तो भुखंड आहे. त्यातील ४ हजार वार जागेचे त्यांच्याकडे कागदपत्र आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— त्याच्याकडे जे कागदपत्र आहेत ते दहा हजार वारपेक्षा जास्त जागेचे आहे.

सदस्य श्री. कृष्णा पुजारी :—निविदा कालावधी संपल्यानंतर बस सेवा चालु ठेवणार की बंद करणार ते सांगा. त्यावेळी लोक आम्हांला विचारतील, बस सेवा बंद का झाली त्यास आम्ही काय उत्तर दयायचे?

सदस्य श्री. राजेश टेकचंदानी :—उल्हासनगर महापालिकेच्या परिवहन उपक्रमात जी बससेवा चालु आहे त्यातील पाच टक्के बससेवेचा सुध्दा शहरवाशियांना फायदा मिळत नाही. सर्व बसेस कल्याण बदलापुर या मार्गावर चालतात. व्यापा—यांना त्याचा तिळमात्र फायदा मिळत नाही. ठेकेदाराच्या फायदयासाठी बससेवा चालु केली आहे का? ज्या उद्देशासाठी बससेवा चालु केली आहे तो सफल होत नाही. परिवहन सेवेबाबत मी समाधानी नाही.

श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—नेहरु चौक ते सिरु चौक हे रस्ते खाली करुन दया. संध्याकाळी मी त्या रस्त्यांवर एक बस चालु करतो. ज्याप्रकारचे आपणाकडुन सहकार्य पाहिजे ते मिळत नाही.

सदस्य श्री. मोहन कंडारे :—कैलास कॉलनी येथिल डेपोच्या आवारात न विचारता आपण बांधकाम केले आहे. त्याबाबत आम्ही कोणत्याही प्रकारची तक्रार केलेली नाही. हा काय कमी फायदा आहे?

सभापती, श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर :—परिवहन समिती सदस्यांना त्यांच्या आजुबाजुच्या ज्या परिसरात बस सेवेचा मार्ग चालु करायचा असेल तर त्यांनी त्याबाबतचे पत्र श्री. चिमनकारे यांच्याकडे दयावे एमएमआरटीएकडुन त्या मार्गास मंजुरी घेवुन येण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहिल.

<u>सदस्य श्री. कृष्णा पुजारी :—</u>बससेवेचा मार्ग लिहुन दिल्यानंतरही आणि एमएमआरटीएकडुन मंजुरी मिळाल्यानंतरही त्या मार्गात बससेवा चालु होत नाही. नागरीक आम्हांला शिव्या देत आहेत.

<u>श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—</u>३१ मार्च पर्यंत १५ बसेस वाढविण्यात येतील. त्यानंतर आवश्यकता पडली तर ९ बसेस कल्याणच्या मार्गावर वाढविण्यात येतील. नेताजी ते कल्याण या मार्गावर १० बसेस वाढविण्यात येतील, खेमानी, धोबीघाट, बिर्लागेट या मार्गावर तीन बसेस वाढविण्यात येतील. म्हारळ, टिटवाळा या मार्गावर तीन बसेस वाढविण्यात येतील. अंबरनाथ, उल्हासनगर, बिर्लागेट, सेंच्युरी, भिवंडी या मार्गावर आणखी ७ बसेसची आवश्यकता आहे. या सर्व मार्गांवरील बसेसची मागणी पुर्ण करण्यासाठी ५० बसेस पाहिजेत. याबाबतीत प्रथम आपणाकडे ठराव होईल त्यानंतर तो एमएमआरटीएकडे जाईल व त्याचा मंजुरी प्राप्त झाल्यावर त्यानंतर त्या मार्गावर बसेस चालु होतील.

<u>सदस्य श्री. आनंद शिंदे :—</u>तर यासाठी दोन वर्ष लागतील.

<u>श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—</u>दोन वर्ष नाही पण दोन तीन महिने लागतील.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :—</u>सुरुवातीस आपण १० बसेस चालु केल्या त्यानंतर ५, १५ बसेस बाबत पत्र दिले आहे आणि २० बसेस येणार आहेत.

<u>श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—</u>आपण बसडेपोसाठी जे भुखंड दिले आहेत ते पुरेसे नाहीत. पावसाळयात त्याठिकाणी शेड उभारली पाहिजे.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :—</u>ती आपली अडचण आहे. त्यासाठी आपण खाजगी भुखंड खरेदी करा. आपणांस जी जागा दिली आहे ती वादग्रस्त आहे. १० वर्षासाठी आपणांस ठेका देण्यात आलेला आहे.

<u>श्री. दिपक चिमनकारे(वाहन विभाग प्रमुख):—</u>विठ्ठलवाडी स्टेशन जवळी जागा पार्किंगसाठी आहे.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :—</u>तर मग ती जागा परिवहन ठेकेदाराला दया. तेथे अतिक्रमण होण्याअगोदर ती जागा त्यांच्या ताब्यात दया.

<u>सदस्य श्री. कृष्णा पुजारी :—</u>ॲम्ब्रेसिया हॉटेल शेजारील जागा यांना दया.

<u>श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—</u>सर्व्हिस स्टेशन पार्किंगसाठी जागा पाहिजे. सर्व्हीस स्टेशन पार्किंगसाठी जागेची आवश्यकता आहे. ती उपलब्ध करुन देण्यात यावी.

<u>सभापती, श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर :—</u>आपण तसे पत्र दया.

<u>श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—</u>बसेसची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी एका स्वतंत्र विभासाठी जागेची आवश्यकता आहे. रात्री एक वाजता बस सेवा बंद झाल्यानंतर सकाळी ६.०० वाजता पुन्हा सुरु केली जाते.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :—</u>बस डेपोच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे जर बांधकाम करायचे असेल तर त्यासाठी परवानगी घेतली पाहिजे.

<u>श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :—</u>करारनाम्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की आपणांस जी काही सुविधा असली पाहिजे त्यासाठी आपण खर्च करुन सुविधा करुन घेवु शकतात.

<u>श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>तात्पुरत्या स्वरुपाची व्यवस्था करावयाची आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>एका ठिकाणावरुन दुसरे ठिकाण फिरविता येईल असे मोबाईल केबीनचे ऑफिस जसे श्री. धिरुभाई अंबानी यांनी केले होते.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :–</u>या बसची संख्या केव्हा वाढविणार आहे तारीख सांगा.

<u>श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :–</u>३१ मार्चला आम्ही २० बसेस देवु

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :–</u>३१ मार्चनंतरही बस वाढवुन दिल्या नाहीत तर ठेकेदारावर दंड आकारला पाहिजे.

<u>श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता :–</u>डेपोसाठी जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे. व पायाभुत सुविधा दिल्या पाहिजे.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :–</u>जी जागा देंणार त्याची मालकी आपणाकडे असली पाहिजे. कागदपत्र आपणाकडे असले पाहिजेत. अशी जागा त्यांना दिली जावी.

<u>काही सदस्य :–</u>पास, पास.....

<u>सभापती, श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर :–</u>सदर विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव समंत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :–**शहर बस सेवा उपक्रमांत बस संख्या वाढविणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

मा.सभापती, परिवहन समिती यांनी उल्हासनगर शहराच्या विकासाच्या दृष्टीने व नागरिकांच्या होणा–या गैर सोईचा विचार करून परिवहन सेवेमध्ये ज्या मार्गाचा समावेश आहे अशा मार्गावर नव्याने नविन २० बसेस सुरू करण्याबाबत विचार करण्याकरीता लवकरात लवकर बैठक बोलविण्यास कळविले आहे.

सदर बाबत असे सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेमध्ये सुरूवातीला १० बसेसनी सुरूवात केली होती.सदर १० बसेस मधील ८ बसेस अंबरनाथ ते कैलाश कॉलनी कॅम्प नं.५,४,३,२,१ व दोन बसेस अंबरनाथ ते खेमाणी, आवतराम चौक व दिनांक २८/१०/२०१० पासून अंबरनाथ ते बदलापुर या मार्गावर ५ बसेस सुरू करण्यात आलेल्या आहेत.

या अनुषंगाने मा.सभापती, परिवहन समिती यांनी कळविल्यानुसार सदर विषयावर चर्चा विनिमय करण्यासाठी गोषवारा मा.परिवहन समिती पुढे सादर करण्यात येत आहे.

<u>परिवहन समिती ठराव क्रं. १०</u> <u>दिनांक २/२/२०११</u>

सूचकाचे नाव : श्री. मोहन कंडारे

अनुमोदकाचे नाव : श्री. विलास डांगे

ही परिवहन समिती शहर बस सेवा उपक्रमांत ३१ मार्च २०११ पुर्वी २० बसेस वाढविणेस प्रशासनामार्फत अभिकर्तांना निर्देश देत आहे.

सूचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨ <u>विषय क्र. ३ :–</u> उल्हासनगर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसेसचा गोल मैदान ते टेलिफोन एक्सचेज, रिजन्सी हॉटेल ते महापालिका असा नवा मार्ग करणे व रिजन्सी हॉटेल जवळ, स्वीट होम समोर नविन बस थांबा बनविणेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>बस थांबा बांधण्या अगोदर मान्यता घ्यायची असते की, बांधल्यानंतर? कायदयात काय तरतुद आहे ती सांगितली जावी. कुणाच्या घरासमोर, दुकानासमोर, बसस्टॉप लावला जावु शकतो का?

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :–</u>बसथांबे कुठे लावावे या विषयी नगररचनाकारांचा अभिप्राय घेतला जावा असे मागील दोन तीन सभांमध्ये सांगण्यात आले होते त्यानुसार नगररचनाकारांचा अभिप्राय घेतला आहे काय?

<u>सदस्य श्री. सुनिल गंगवानी :–</u>कोणकोणत्या ठिकाणी बस थांबे लावता येवु शकतील याबाबत सर्व्हे केला पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>ज्या मार्गांवर अदयाप बससेवा सुरु केलेली नाही त्या मार्गांवर जे बसथांबे बांधण्यात आलेले आहे ते काढुन टाकले जावेत.

<u>श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>त्याबाबतीत त्यांना पत्र दिले आहे.

<u>श्री. राजा गेमानी, परिवहन अभिकर्ता:–</u>जे,जे मार्ग आपण मंजुर करुन दिले आहेत, त्या त्या मार्गांवर बसथांबे उभारण्यात आले आहे. व त्या मार्गांवर बससेवा चालु करण्यांत आलेली आहे. जे बसथांबे आपणांस नको आहेत त्याबाबतीत आपण ठराव करा मी ते बसथांबे काढुन घेतो.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :–</u>लोक आम्हांला हसतात. ज्या मार्गावर बस चालु नाही त्या मार्गांवर बस थांबे का बांधुन ठेवले आहेत?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>ज्या मार्गांवर बससेवा चालु नाही त्या मार्गांवरील बससेवा काढुन टाकले जावे.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :–</u>ज्या मार्गांवर अदयाप बससेवा सुरु केलेली नाही त्या मार्गांवर लावण्यात आलेले बस थांबे काढुन टाकण्याबाबतीत आम्ही आपणांस ठराव देतो. ते बसथांबे नेहमी करीता काढुन टाका.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>रिजेन्सी हॉटेलजवळ बिना परवानगी बसथांबा लावण्यात आलेला आहे. तो बेकायदेशीर आहे. तो त्वरीत काढुन टाकला जावा.

<u>सदस्य श्री. सुनिल गंगवानी :–</u>तेथे बसथांबा का लावला जावु नये त्याची कुणाला अडचण आहे काय?

<u>सदस्य श्री. आनंद शिंदे:–</u>आम्ही एक महिना अगोदर पत्र दिले आहे. त्या मार्गांवर अदयाप बससेवा सुरु केलेली नाही.

**<u>सदस्य श्री. सुनिल गंगवानी :–</u>**मी पण तीन महिन्यापुर्वी पत्र दिले आहे. त्या मार्गावरील बससेवा सुरु केलेली नाही.

**<u>श्री. दिपक चिमनकारे(वाहन विभाग प्रमुख):–</u>**कैलास कॉलनी, चोपडा कोर्ट, शहाड फाटक असा एक मार्ग मंजुर आहे. यांचे पत्रानुसार तो मार्ग थोडासा वळवुन घेतला आहे.

**<u>सदस्य श्री. आनंद शिंदे :–</u>**हे दुजाभाव करत आहेत. आम्ही दिलेल्या पत्राची दखल घेत नाहीत.

**<u>सदस्य श्री. कृष्णा पुजारी:–</u>**धोबीघाटचा मार्ग यामध्ये घेतलेला नाही.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>**रिजेन्सी हॉटेल शेजारी, बसस्टॉप लावण्यासाठी परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे तो हटविला जावा.

**<u>सदस्य श्री. सुनिल गंगवानी :–</u>**तर मग एक सुध्दा बस थांबा लावला जावु नये.

**<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :–</u>**बसथांबा उभारण्याअगोदर त्यासंबंधी नगररचना विभागाचा अभिप्राय येणे आवश्यक आहे. तो अदयापपर्यंत आलेला नाही.

**<u>सदस्य श्री. आनंद शिंदे:–</u>**आमच्या विभागातील मार्गावर बससेवा सुरु करावी असे मी व श्री. मरसाळे यांनी पत्र दिले आहे. त्यानुसार त्यामार्गावर अदयाप बससेवा सुरु झालेली नाही. सर्व सदस्यांनी मागणी केल्यानुसार जर त्यांनी सुचविलेल्या मार्गावर बससेवा सुरु करण्याचा प्रस्ताव मंजुरीस आला असता तर आम्ही सर्वांनी आपल्या प्रस्तावाचे समर्थन केले असते.

**<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :–</u>**उल्हासनगर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसेसचा गोल मैदान ते टेलिफोन एक्सचेज, रिजन्सी हॉटेल ते महापालिका असा नवा मार्ग करणे व रिजन्सी हॉटेल जवळ, स्वीट होम समोर नविन बस थांबा हा नवा मार्ग सुरु केला जावा. व रिजेन्सी हॉटेल शेजारी उभारण्यात आलेला बसथांबा तत्काळ हटविला जावा.

**<u>काही सदस्य :–</u>**पास, पास.....

**<u>सभापती, श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर :–</u>**सदर विषयाबाबत बहुमताने पुढील प्रमाणे ठराव समंत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ३** :–उल्हासनगर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसेसचा गोल मैदान ते टेलिफोन एक्सचेज, रिजन्सी हॉटेल ते महापालिका असा नवा मार्ग करणे व रिजन्सी हॉटेल जवळ, स्वीट होम समोर नविन बस थांबा बनविणेस मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

श्री.सुनिल एस.गंगवानी, नगरसेवक, श्री.दिलीप देविदास जग्यासी, नगरसेवक, श्री.राजु (जिवन) चंद्रभान इदनानी, नगरसेवक यांनी गोलमैदान ते टेलिफोन एक्सचेंज, रिजन्सी हॉटेल ते महापालिका या परिसरात अनेक हॉटेल, बॅका, दुकाने असून, या परिसरातच न्यायालय व महापालिका मुख्यालयाचा रस्ता आहे.तसेच तेथे लोकवस्तीचे प्रमाणही जास्त आहे. यामुळे या परिसरात नागरिकांची वर्दळ/ये–जा मोठया प्रमाणात नेहमीच होत असते.नागरिकांच्या सोयीसाठी उल्हासनगर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसेसचा गोलमैदान ते टेलिफोन एक्सचेंज, रिजन्सी हॉटेल ते महापालिका असा नविन मार्ग (रूट) करणे व रिजन्सी हॉटेल जवळ, स्वीट होम समोर नविन बस थांबा (बसस्टॅन्ड) बनविण्यासाठी योग्य ती कार्यवाही त्वरीत करण्यास कळविले आहे.

या अनुषंगाने ठेकेदार में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर यांनी रिजन्सी हॉटेलजवळ बस थांबा उभारलेला आहे.सदर बस थांब्याबाबत श्री.गुल.एच.भाटीया, यांनी दिनांक १६/१०/२०१० च्या पत्रान्वये त्यांच्या Clinic समोर बस थांबे लावण्याची तक्रार केली आहे.तसेच सदर बस थांब्याच्या मागे सिंडीकेट बॅक व निमसन बीअर शॉप आहे व तेथे बस थांबे उभारल्यामुळे तेथे तरूण मुले बसून दारू पिऊ शकतात व बॅकेत आलेल्या लोकांना चोरीचा त्रास होऊ

शकतो असेही कळविले आहे.या अनुषंगाने श्री.गुल भाटीया यांनी सदर बस थांबा काढण्याबाबत विनंती केली आहे. तसेच श्री.बुल्लर सिंह महाराज,मा. सभापती स्थायी समिती यांना सदर बस थांबा काढण्याबाबत कळविले आहे.

सदर बाबत असे सादर करण्यात येते की,सदर मार्गावर बस सेवा सुरू नाही व ठेकेदाराने तेथे बस थांबा उभारलेला आहे.परंतु सन्मानीय नगरसेवक,श्री.सुनिल एस.गंगवानी, श्री.दिलीप देविदास जग्यासी,श्री.राजु (जिवन) चंद्रभान इदनानी यांनी तेथे बस थांबा उभारण्यास व रूट चालु करण्यास कळविले आहे.सदर बाबत सादर करण्यात येते की, M.M.R.T.A समितीने शिवमंदीर ते कल्याण व्हाया चोपडा कोर्ट असा मार्ग मंजुर केलेला आहे.सोबत मार्ग सादर.सदर मार्गात चोपडा कोर्ट आधी रिजन्सी हॉटेल,बी.एस.एन.एल,गुरू गोंविदसिंग दरबार असा किरकोळ बदल करण्यास हरकत नाही.तरी सदर बाबत आपली मंजुरी मिळणे आवश्यक आहे.आपली मंजुरी प्राप्त होताच सदर मार्ग लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

तसेच सदर मार्ग सुरू केला तर बस थांब्याची आवश्यकता भासेल.तरी सदर उभारण्यात आलेला बस थांबा ठेवण्यास व सदर मार्गात किरकोळ बदला बाबत निर्णयास्तव गोषवारा मा.परिवहन समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

<u>परिवहन समिती ठराव क्रं. ११</u> <u>दिनांक २/२/२०११</u>

सूचकाचे नाव : श्री. कृष्णा पुजारी

अनुमोदकाचे नाव : श्री. नामदेव मरसाळे

ही परिवहन समिती उल्हासनगर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसेस गोल मैदान ते टेलिफोन एक्सचेज, रिजन्सी हॉटेल ते महापालिका असा नवा मार्ग करण्यास मान्यता देत आहे. परंतु रिजन्सी हॉटेल जवळ, स्वीट होम समोर नविन बस थांबा बनविणेस मान्यता देत नाही.

जर सदर ठिकाणी यापुर्वीच बस थांबा तयार करण्यात आला असेल तर तो त्वरीत हटविण्यात यावा.

सूचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>बहुमताने</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

<u>विषय क्र. ४ :—</u> उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमात इलेक्ट्रॉनिक मल्टी तिकिटींग सिस्टीम मान्य करणे.

---

<u>सदस्य श्री. विलास डांगे:—</u>या विषयाबाबत सभेपुर्वी जो डेमो दाखविण्यात आला आहे त्यानुसार हा विषय जनतेच्या फायदाचा आहे. ही योजना व्यवस्थितपणे चालु होवु दया असे माझे मत आहे. या विषयाबाबतीत इतरांचे काय मत आहे ते आपण घेवु शकता. जे लोक मिरा—भाईदर येथे बसने जा ये करतात त्यांच्यासाठी ही योजना फायदेशीर आहे. स्मार्ट कार्ड सारखे जे कार्ड दिले जाणार आहे त्यावर आपल्या महापालिकेचेही नाव असणार आहे. ट्रायमेंस ट्रान्सपोर्ट सोल्युशन या संस्थेने कार्डच्या पैश्यांची उदया सकाळ काही अफरातफर केली तर त्या कार्डवरील उल्हासनगर महापालिकेच्या नावामुळे ते प्रकरण आपणावर येणार आहे. त्यामुळे या विषयावर सविस्तर अभ्यास करण्यासाठी काही वेळ दिली जावी. हा विषय पुढच्या सभेत घेवुन त्यावर निर्णय घेतला जावा.

<u>काही सदस्य :—</u>हा विषय सभेच्या कामकाजातुन वगळण्यात यावा.

<u>सभापती, श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर :—</u> सदर विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव समंत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ४ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमात इलेक्ट्रॉनिक मल्टी तिकिटींग सिस्टीम मान्य करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या बी.ओ.ओ.टी. तत्वावर पी.पी.पी. अंतर्गत शहर बस सेवा मे. केस्ट्रल इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. उल्हासनगर यांचे मार्फत सुरू करण्यात ओलेली आहे. सदर बस सेवेचे आधुनिक पध्दतीचे इलेक्ट्रॉनीक तिकिटींग लवकरच मे. केस्ट्रल इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. मार्फत करण्यात येणार आहे. परंतु शहरातील नागरीक दैनंदिन प्रवासाकरीता सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा (रेल्वे, बी.इ.ए.टी.,एम.बी.एम.टी. एस.टी. इत्यादी) वापर करणा—या नागरीकांचा प्रवास सुकर होणेच्या दृष्टीने '' मल्टी तिकीटींग सिस्टम'' सुरू करावे असे JNNURM योजने संबंधात केंद्र शासनास अभिप्रेत आहे.

या अनुषंगाने ''मल्टी तिकिटींग सिस्टीम'' सुरू करण्याबाबतचा गोषवारा उल्हासनगर महानगरपालिकेच्या मा. परिवहन समितीपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता.मा. परिवहन समितीने सदर मल्टी तिकिटींग बाबतचे प्रात्याक्षिक दाखविण्याबाबत कळविले होते व सदर कंपनीकडे प्रात्याक्षिक दाखविण्याबाबत विचारणा केली असता सदर कंपनीने प्रतिसाद दिला नाही.आता शासनाने मल्टी तिकिटींगसाठी दुसरी कंपनी में. ट्रायमॅक्स प्रा.लि. यांची नियुक्ती केलेली आहे.

सदर बाबत दिनांक १४/०१/२०११ रोजी मा. प्रधान सचिव यांच्या बैठकीत दिलेल्या सुचनेप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमात मल्टी तिकिटींग सिस्टीमचे {प्रात्याक्षिक (Demonstration)} दाखवून सदर मल्टी तिकिटींगचा उपक्रम राबविण्यासाठी गोषवारा मा. परिवहन समितीपुढे मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

<u>परिवहन समिती ठराव क्रं. ११ अ</u> <u>दिनांक २/२/२०११</u>

सूचकाचे नाव : श्री. संजय सिंग

अनुमोदकाचे नाव : श्री. आनंद शिंदे

ही परिवहन समिती उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमात इलेक्ट्रॉनिक मल्टी तिकिटींग सिस्टीम सुरु करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव पुढील सभेत घेण्याप्रयोजनार्थ आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सूचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>
सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>सभापती, श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर :—</u>या सभेचे कामकाज संपल्याचे मी जाहीर करतो

सांयकाळी ५.१० वाजता सभापती श्री. मिलिंद जगन्नाथ चोडनकर यांनी सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)

महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–११/४/२०११

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ११/४/२०११ रोजीच्या परिवहन समिती सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची परिवहन समितीची सभा सोमवार दिनांक ११/४/२०११ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत **श्री. सुभाष सोनवणे, जिल्हाधिकारी, रायगड (अलिबाग)** हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| अ.क्र. | सदस्याचे नाव |
|---|---|
| १ | श्री.मिलिंद जगन्नाथ चोडनकर |
| २ | श्री. लाल देवनदास पंजाबी |
| ३ | श्री. कृष्णा गिरीया पुजारी |
| ४ | श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी |
| ५ | श्री. मोहन रामसिंग कंडारे |
| ६ | श्री.लालता प्रसाद शिवमुर्त तिवारी |
| ७ | श्री. सुनिल एस. गंगवानी |
| ८ | श्री. जे.के. ढोके |
| ९ | श्री. नामदेव मरसाळे |
| १० | श्री. विलास डांगे |
| ११ | श्री. आनंद शांताराम शिंदे |
| १२ | श्री. संजय आयोध्याप्रसाद सिंग |
| १३ | श्री. आदिनाथ यादवराव जाधव |

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त
२. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. ह.न. जमादार, उप मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. नानासाहेब कामठे, प्रभाग अधिकारी
७. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
८. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
९. श्री.बी.ए.महोदय, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१०.श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विद्युत
११.श्री. भगवान कुमावत, प्र.प्रभाग अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती अमिता संखे
३. श्रीमती नर्गिस खान

दुपारी २.५९ सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u> मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ मधील नियम—४ अन्वये विशेष समिती सभापती पदाची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुभाष सोनवणे, जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १** :— परिवहन समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

---

<u>श्री. सुभाष सोनवणे (पीठासीन अधिकारी):—</u>
**परिवहन समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** ८/४/२०११ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये ५ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून ते अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ क्र | उमेदवाराचे नाव व पत्ता | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. आदिनाथ यादवराव जाधव | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी | श्री. संजय आयोध्याप्रसाद सिंग |
| २ | श्री. आदिनाथ यादवराव जाधव | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी | श्री. संजय आयोध्याप्रसाद सिंग |
| ३ | श्री. विलास पितांबर डांगे | श्री. नामदेव गोविंद मरसाळे | श्री. कृष्णा गिरीया पुजारी |
| ४ | श्री. विलास पितांबर डांगे | श्री. नामदेव गोविंद मरसाळे | श्री. कृष्णा गिरीया पुजारी |
| ५ | श्री. आनंद शांताराम शिंदे | श्री. राजेश एम. टेकचंदानी | श्री. मोहन रामसिंग कंडारे |

**परिवहन समिती सभापती** पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. जाधव आदिनाथ यादवराव |
| २. | श्री. डांगे विलास पितांबर |
| ३ | श्री. शिंदे आनंद शांताराम |

यावेळेस २.५९ मिनिटे झाली आहेत.

वरील ३ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

आता ३.१४ वाजले आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्ये श्री. जाधव आदिनाथ यादवराव या उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली.

आता, परिवहन समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी २ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिलेले असून त्यांची मराठी वर्णानुक्रमाने नावे पुढील प्रमाणे आहेत :—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. डांगे विलास पितांबर |
| २. | श्री. शिंदे आनंद शांताराम |

परिवहन समिती सभापती पदासाठी मराठी वर्णानुक्रमाने अनु. क्र. १ आणि २ च्या उमेदवारांची नांवे जाहिर करण्यात येतील. प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने ज्यांना आपले मत द्यावयाचे आहे त्यांनी आपला हात वर करायचा आहे. उमेदवार निहाय तयार केलेल्या यादीमध्ये उमेदवाराला मतदान करणा—या सदस्यांच्या नावांची नोंद घेण्यात येईल. हात वर केलेल्या प्रत्येक सदस्याच्या नावासमोर ''होय'' म्हणुन नोंद घेण्यात येईल.

यावेळी सदस्य श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी व श्री. मोहन रामसिंग कंडारे हे सभागृहातुन बाहेर गेले. 

सर्वप्रथम परिवहन समिती सभापती पदाचे अनु. क्र. १ चे उमेदवार श्री. डांगे विलास पिंताबर यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. डांगे विलास पिंताबर यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. मिलींद जगन्नाथ चोडनकर |
| २ | श्री. लाल देवनदास पंजाबी |
| ३ | श्री. कृष्णा गिरीया पुजारी |
| ४ | श्री. लालता प्रसाद शिवमुर्त तिवारी |
| ५ | श्री. नामदेव मरसाळे |
| ६ | श्री. विलास डांगे |

त्यानंतर परिवहन समिती सभापती पदाचे अनु. क्र. २ चे उमेदवार श्री. शिंदे आनंद आत्माराम यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. शिंदे आनंद आत्माराम यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. सुनिल एस. गंगवानी |
| २ | श्री.जे.के. ढोके |
| ३ | श्री. आनंद शांताराम शिंदे |
| ४ | श्री. संजय आयोध्याप्रसाद सिंग |
| ५ | आदिनाथ यादवराव जाधव |

परिवहन समिती सभापती पदाच्या निवडणकीमध्ये ज्या सदस्यांनी मतदान केले नाही अशा सदस्यांच्या मताची नोंद पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| निरंक | |

आता निवडणूक प्रक्रिया संपल्याने निवडणूक लढविलेल्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या व निकाल घोषणा मी पुढीलप्रमाणे घोषित करीत आहे.

## निकाल घोषणा

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डांगे विलास पितांबर | ०६ |
| २. | श्री. शिंदे आनंद शांताराम | ०५ |
| **एकुण मतदान संख्या –** | | **११** |
| **तटस्थ** | | ० |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम २००७ च्या नियम–६ मधील पोटनियम (७) अन्वये पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारान्वये परिवहन समिती सभापती पदाचे उमेदवार श्री. डांगे विलास पितांबर यांना एकुण ११ मतांपैकी ०६ इतकी म्हणजे सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची **परिवहन समिती सभापती** पदी रितसर नेमणूक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :–११/४/२०११

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

(सुभाष सोनवणे)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी

यावेळी दुपारी ३.२८ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर

जा. क्र. उमपा/ स.का/२/२०११,
भारतीय मानक संघ प्रमाणीत (ISO-9001-2000)
सचिव कार्यालय,
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर.३.

दिनांक :— २/७/२०११

# नोटिस

याद्वारे परिवहन समितीच्या सर्व सदस्यांस नोटिस देण्यांत येते की, परिवहन समितीची ***सभा* मंगळवार दिनांक *१२/७/२०११* रोजी सायंकाळी ४.०० वाजता** महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील *परिवहन समिती सभापती यांच्या दालनात* खालील विषयांसाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत परिवहन समितीच्या सर्व सदस्यांनी कृपया उपस्थित रहावे ही विनंती.

मा. सभापती
यांच्या आदेशान्वये,

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

✷✷✷ सभेपुढील विषय ✷✷✷

१ मागील सभेचे दिनांक ११/४/२०११ व २८/३/२०११ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.
***ज्व बवदपितउ जीम उपदनजमे व िसेंज ज्तंदेचवतज व्वउउपजजमम उममजपदह कजण ११६४६२०११ - २८६३६२०११***

२ उल्हासनगर महानगरपालिकेतर्फ बी.ओ.ओ.टी तत्वावर चालविण्यात येणा—या परिवहन सेवेच्या बसेस शासन मान्यता प्राप्त लाल रंगाच्या करण्यास मंजुरी देणे.
***ज्व ंचचतवअम जीम ळवअजण ंदवूद त्मक व्वसवनतपदह व िडनदपबपचंस ठनेमे इमपदह वचमतंजमक पद जीम बपजल व िन्सींदंहंत वद ठव्व्ज ठेंपे***

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.